महाराष्ट्र शासन

शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/उमाशि४/स्कॉलरशिप/ पुवि/२०१७-१८/ दि.- 31 /१० /२०१७.

प्रति,

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक),

जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर.

**विषयः- Processing of application received on the MahaDBT Portal.**

संदर्भः-मा.आयुक्त, शिक्षण, शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांचे पत्र क्र.अशाप पत्र क्र.अंदाज/संकीर्ण/ MahaDBT /२०१७/ ५०१९/ दि.२७.१०.२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे मा.आयुक्त, शिक्षण यांचे पत्र प्रस्तुत कार्यालयास प्राप्त झाले असून, पुणे विभागांतर्गत कार्यरत असलेले पुणे, अहमदनगर, सोलापूर या तीन जिल्हयांमधील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांनी MahaDBT या ऑनलाईन पोर्टलवर विद्यार्थ्यांचे खालीलप्रमाणे योजनांबाबत आवश्यक तेवढी आवेदनपत्रे भरलेली नाही, त्यामुळे शासनाने याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आपल्या अधिनस्त जिल्हयांमध्ये आपण तात्काळ MahaDBT या ऑनलाईन पोर्टल वापराबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये माहिती होईल या दृष्टीने सर्व प्रसिध्दी माध्यमांव्दारे तात्काळ प्रसिध्दी दयावी.

१.पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती (सद्यस्थितीत उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ.५ वी स्तर) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ. ८ वी स्तर) ( एकूण ४ लेखाशीर्षाखाली ही शिष्यवृत्ती देण्यात येते)

२.कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील गुणवत्ता शिष्यवृत्ती.

३.आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती.

४.संस्कृत शिष्यवृत्ती.

५.उपस्थिती भत्ता.

कृपया उपरोक्तप्रमाणे दर्शिविल्यानुसार शिष्यवृत्ती योजनांबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही आपल्या तसेच कनिष्ठ महाविद्यालय, प्राथमिक व माध्यमिक शाळा स्तरावर करण्यात यावी, सदरचे कामकाज हे कालमर्यादित असल्याने, कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही याची कृपया आपण दक्षता घ्यावी.

MBRaut 31.10.17

(मिनाक्षी राऊत)

सहा. शिक्षण संचालक,

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग, पुणे कार्यालय

प्रत :- मा.आयुक्त, शिक्षण, शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांना सविनय सादर.

डॉ.विपिन शर्मा
आयुक्त, शिक्षण

Dr. Vipin Sharma
Commissioner, Education
Tel No. 020 – 26120441

शिक्षण उपसंचालक विभाग पुणे यांचे कार्यालय
31 OCT 2017
आवक नोंदवही क्रमांक ९८८९७

सत्यमेव जयते

आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र शासन
शिक्षण आयुक्तालय
मध्यवर्ती इमारत, डॉ.अँनी बेझंट मार्ग
पुणे ४११ ००१
Commissioner, Education, Maharashtra State
Government of Maharashtra
Commissionerate of Education
Central Building, Pune 411 001

अ.शा पत्र क्र.अंदाज/ संकिर्ण /MahaDBT/२०१७/५०१९
दिनांक- २७/१०/२०१७

विषय - **Processing of application received on the MahaDBT portal.**

प्रिय

मा. मुख्यमंत्री महोदयांचे उपरोक्त विषयाबाबतचे दि. ११ ऑक्टोबर, २०१७ चे व शासनाचे दि. २५ ऑक्टोबर, २०१७ चे सोबत जोडलेले पत्र कृपया पहावे.

शालेय शिक्षण विभागाच्या खालील ५ योजना MahaDBT पोर्टलवर घेण्यात आल्या आहेत.

१. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती (सद्यस्थितीत उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी स्तर) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इयत्ता ८ वी स्तर ) ( एकूण चार लेखाशीर्षाखाली ही शिष्यवृत्ती देण्यात येते.)
२. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील गुणवत्ता शिष्यवृत्ती.
३. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती.
४. संस्कृत शिष्यवृत्ती.
५. उपस्थिती भत्ता.

उपरोक्त योजनांची दि. १९ सप्टेंबर, २०१७ पर्यंत प्राप्त अर्जांची संख्या अनुक्रमे ९६,४००,२३,९३, व ३ अशी आहे. सदर संख्या खुपच कमी असल्याबाबत उपरोक्त अ.शा पत्रान्वये कळविण्यात आले आहे. MahaDBT पोर्टल च्या वापराबावत क्षेत्रीयस्तरावर गांभीर्याने कार्यवाही केली जात नाही. याबाबत शासनस्तरावरून नाराजी व्यक्त करण्यात आलेली आहे. MahaDBT पोर्टलवर छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत १ कोटी शेतकऱ्यांनी यशस्वीपणे नोंदणी केली आहे. हे विचारात घेता शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सदर पोर्टलवर नोंदणी करणे सहज शक्य आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी MahaDBT पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांची अमलबजावणी करणे ही बाब KRAs मध्ये समाविष्ट केली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी आपण व्यक्तिशः लक्ष्य घालून क्षेत्रीय स्तरावरून याबाबतची माहिती सर्व शाळांना मिळेल यादृष्टीने नियोजन करावे. MahaDBT पोर्टलच्या वापराबाबत प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच अर्ज स्वीकारण्याचे काम दि. ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत पूर्ण करण्यात यावे.

आपला
27-10-17
(डॉ. विपिन शर्मा)

प्रति,
श्री.दिनकर टेमकर,
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे

604